Date: / /
Page No.:

# शब्द

शब्दांची किमया सारी
जीवास मोहवणारी
नात्यास जपणारी
भावना उलघडणारी
मनास मोहवणारी

शब्दांचे खेळ सारे
जाळ्यात खेचणारे
हुरहुर लावणारे
लोण्याने माखलेले
साखरेत घोळलेले
फसवे जरी असले
परि मनास भावलेले

शब्दांचे बाण विषैले
काळजात रुतलेले
माणुसकी विसरलेले
हृदयास विंधणारे
नात्यांना तोडणारे

शब्दांचे अर्थ बदलले
परि शब्दांचेच जग सारे

शब्दांनीच उलघडली
शब्दांची परिभाषा
शब्दांचा खेळ मांडला
शब्दातच गुंतलो सारे.

सौ. ऐश्वर्या डगांवकर
कोथरुड, पुणे 38.